# नाते

प्रकाशित: सिध्दिी टाईम्स २००८

रत्नाकर वाणी

पुनरारंभ

© पुनरारंभ

website: http://www.rajratna.co.in Email: ratnakar.wani@rajratna.co.in

# नाते

परवा सहजच एक जुने विनोदी मासिक हाती आले. त्यातील विविध विनोदी गोष्टी व चुटकुले वाचत होतो. वेळ जात होता. मनाची करमणूक होत होती. वाचता वाचता एक विनोदी चुटकुला वाचण्यात आला. तो असा.

" एक खवचट तरूण आपल्या पत्नीसह जात असतांना समोरून पाच पंचवीस म्हशींचा तांडा दृष्टीस पडला. त्यांच्याकडे पाहत तो पत्नीला म्हणाला, 'ती बघ तुझी नातेवाईक मंडळी.' पत्नी सत्वर आपली प्रतिक्रीया व्यक्त करित उत्तरली. 'अय्या खरंच ! एवढया नातेवाईकांना एकदम भेटण्याचा आज छान योग आला.' त्यावर पतिमहाशय म्हणाले, 'म्हणजे त्या सर्व तुझ्या नात्यातल्या असल्याचे तु कबुल करतेस तर !' हजर जबाबी पत्नी म्हणाली, 'होय, केलच पाहिजे. कारण, सासरच्या सर्व नातेवाईकांना मी आता चांगलीच ओळखू लागली आहे."

असो, यात विनोदाचा भाग सोडला तर विषय गहन आहे. गंभीरपणे विचार करण्या जोगा आहे. नाते कोणतेही असो पती-पत्नी, भाउ-बहिण, पिता-पुत्र, दोन भाउ, दोन मित्र किंवा मैत्रिणी इत्यादी. एकमेकाचे मनात एकमेकाबद्दल आदर, प्रेम, माया असणे फार जरूरीचे आहे. या वरच नाती गोती टिकून असतात. जो पर्यंत आपल्या मनात समोरच्या व्यक्तीबद्दल प्रेम, आपुलकी निर्माण होत नाही, तोपर्यंत ती नाती कीतीही जवळची असली तरी मनाने जोडली जात नाही. नाते दुरावण्यास अनेक छोटी मोठी कारणे कारणीभूत ठरतात. कधीतरी छोटया कारणाने पण आपसी कलह निर्माण होतात, त्यांचे रूपांतर मन मुटाव व नाते दुरावण्यावर होते. नाते हे ऋणानुबंधांनी जुळलेले असते. ते सहजासहजी तोड म्हणता तुटत नाहीत, सोड म्हणता सुटत नाहीत. काही झाले तरी ओळख करून देतांना अमक्याचा तमका किंवा तमक्याचा अमका असे नाते सांगतच ओळख करून दिली जाते.

पती पत्नीच्या नात्याबद्दल सांगायचे झाल्यास, हे नाते फार नाजुक असते. एकमेकांवर प्रेम व पूर्ण विश्वास असणे फार गरजेचे आहे. या व्यतिरिक्त उभयतांचे नातेवाईकाबद्दल प्रेम, आदर, माया

त्याचा पाया आहे. यावरच पती पत्नीचे नाते टिकून असते व संसार सुखाचा होतो. कटू बोलाने वाद निर्माण होतात. त्याचे पडसाद सुखी संसारामध्ये उमटतात. वाद वाढले तर नाते दुरावून संसार मोडण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रसंगी कटू बोल टाळणे व सामंजस्याने वागणे हा नाते टिकविण्याचा गुरूमंत्र ठरू शकेन.

रक्ताचे नाते व मानलेले नाते अशी दोन प्रकारची नाती असू शकतात. रक्ताची नाती अर्थात पिता-पुत्र, माता-पुत्र, दोन सख्खे भाउ किंवा दोन सख्ख्या बहिणी इत्यादी. आजकालच्या विभक्त कुटुंब पध्दती मुळे रक्ताची नाती एकत्र सापडणे जरा कठीणच आहे. जो तो आपापला व्यवसाय धंद्याच्या निमित्ताने वेग वेगळया शहरात अथवा वेगळा घरोबा करून राहतो. कठीण समयी अथवा अडी अडचणीस सर्व नातेवाईक मंडळी एकत्र येण्यास थोडा कालावधि लागतो. तोपर्यंत शेजारचे मानलेले काका-काकू, मामा-मामी, भाउ-वहिनीच नातेवाईक बनून मदतीस धावून येतात. ही मानलेली नाती सदैव आपल्या समवेत असतात. केवळ त्यांना आपल्याकडून मिळालेले प्रेम व आदर यामुळेच ते मदतीस धावून येतात. त्यांची मदत हे एक प्रेमाचे द्योतकच नाही का?

नाती रक्ताची, प्रेमाची अथवा मानलेली कोणतीही असोत, मनाशी जुळलेले असावे, अन्यथा सारा गाव मामाचा पण एक नाही कामाचा. प्रेम दिल्याने प्रेम मिळते. प्रेम द्यावे तैशे घ्यावे. प्रेमाचा हा दीप घरोघरी कायम जळत रहावा.